वाचा -या कार्यालयाचे पत्र क्र.का.५/मुद्रांक/डिपॉझीट ऑफ टायटल डिड/प्रक्र११०१/२०००/८४१-९४१ दि.०२/०९/२०००

---

क्र.का.५/मुद्रांक-११/प्र.क्र.११०१/२०००/१६४९/११
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - १३/१२/२०११.

विषय :- गहाणखताचे प्रत्यंतरणपत्र (Reconveyance of mortgage deed) दस्तऐवज नोंदवितांना मूळ गहाणखताचे (mortgage deed) दस्तऐवज योग्य मुद्रांक शुल्क व नोंदणी फी देय केलेले नसतांना मिळकत उताऱ्यावरुन नोंदविणेबाबत.

## परिपत्रक

या कार्यासनाकडून डिपॉझीट ऑफ टायटल डिड संदर्भात दिनांक ०२/०९/२००० रोजीचे पत्रान्वये, राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना उद्देशून डिपॉझीट ऑफ टायटल डिड (इक्विटेबल मॉर्टगेज) चे दस्तऐवजांचे बाबतीत हक्क पत्रकावर बोजा न घेणेबाबत सूचना वजा मार्गदर्शन करणेत आलेले आहे.

तरी सुध्दा या कार्यालयाचे तपासणी पथकाने केलेल्या तपासणीअंती असे निदर्शनास आले आहे की, तलाठी व सिटी सर्व्हे कार्यालयाकडून डिपॉझीट ऑफ टायटल डिड/ इक्वीटेबल मार्गेज डिड या दस्तऐवजाद्वारे पक्षकाराचे मिळकतीचे अधिकार अभिलेख (रेकॉर्ड ऑफ राइटस् / ७/१२ उतारा व सिटी सर्व्हे कर) ला नोंद घेतली जाते. जर अशा प्रकारची नोंद घेतली असेल तर ते साधे गहाणखत समजून, त्यावेळेच्या प्रचलित दरानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसूल करणे आवश्यक आहे.

तेव्हा सर्व दुय्यम निबंधकांनी आपले कार्यालयात गहाणखताचे प्रत्यंतरणपत्र (Reconveyance of mortgage deed) दस्तऐवज नोंदणीसाठी आले असता, मूळ

गहाणखताचे (mortgage deed) दस्तऐवजावर यथोचित मुद्राक शुल्क व नोंदणी फी शासनास जमा केली किंवा कसे? याची खातरजमा करावी. जर मूळ गहाणखतावर मुद्रांक शुल्क व नोंदणी फी जमा केली गेली नसल्यास, त्यावर आवश्यक मुद्रांक शुल्क वसूलीसाठी मुंबई मुद्रांक अधिनियम,१९५८ मधील कलम ३३ नुसार सदरचा दस्तऐवज अटकावून मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविणे आवश्यक आहे. उक्त दस्तावर मुद्रांक शुल्क जमा झाल्यानंतरच अशा दस्तांचे गहाणखताचे प्रत्यंतरणपत्राचे (Reconveyance of mortgage deed) दस्तऐवज नोंदविणे आवश्यक आहे. दुय्यम निबंधक कार्यालयाकडून असे अटकाविलेले दस्तऐवज मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाल्यास, त्यावर मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करुन, प्रकरण निकाली काढावेत.

**सही/- XXX**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत-

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
३) सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
२/- सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार्यालयास आपले स्तरावरुन वितरीत कराव्यात.
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

**निर्गमित,**

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.**